आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दु ३.०० वाजता

८ जुलै २०२४ - सोमवार

मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे उद्भवलेल्या स्थितीचा सामना करण्यासाठी शासनाने विविध पावलं उचलली आहेत असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत सांगितलं. मुंबईत निर्माण झालेल्या पूर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीनंतर ते पत्रकारपरिषदेत बोलत होते. बैठकीला मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, आदी उपस्थित होते. मुंबई आणि उपनगरात कालपासून आज सकाळी सात वाजेपर्यंत ३०० मिलीमिटर पावसाची नोंद झाली. या पावसामुळे मुंबईच्या सखल भागात पाणी साचलं असून रस्ते आणि रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली आहे. पाणी उपसण्याचं काम सुरु असून रेल्वे, महानगरपालिका आणि इतर यंत्रणा समन्वयाने परिस्थितीतून मार्ग काढत आहेत असं शिंदे यांनी सांगितलं. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसामुळे पूरसदृश स्थिती उद्भवली असून तिथं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथकं मदतीसाठी तैनात आहेत, असं ते म्हणाले. आपत्तीच्या वेळी राजकारण न करता सर्वांनी सहकार्य करावं असं आवाहन त्यांनी केलं. किनारपट्टीच्या सर्व जिल्ह्यांमधे उद्यापर्यंत मुसळधार पावसाची शक्यता वेधशाळेनं व्यक्त केली असून त्यादृष्टीने आवश्यकता असेल तरच घरातून बाहेर पडावं आणि यंत्रणांना सहकार्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

राज्यशासनानं मुंबई, ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या शाळांना आज सुट्टी जाहीर केली आहे. मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि मुक्त अभ्यासक्रमाच्या आज होणाऱ्या सर्व परीक्षा रद्द केल्या असून या परीक्षा आता १३ जुलैला होणार आहेत.

नाशिक- मुंबई महामार्गावर पावसामुळे वाहतूक ठिकठिकाणी खोळंबली असून रेल्वे मार्गावरच्या लांब पल्ल्याच्या दोन गाड्या रद्द झाल्या आहेत. मुसळधार

पावसामुळे ठाणे, वसई, महाड, चिपळूण, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सिंधुदुर्ग इथं एनडीआरएफची पथकं तैनात करण्यात आली आहेत. रायगड जिल्ह्यात जोरदार पाऊस होत असून नद्यांच्या पाण्यात वाढ झाली आहे. रायगड किल्ला परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्यामुळे आज पासून रायगड किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात आला आहे. किल्ल्यावर अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे उतरवण्यात येत आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातही संततधार पाऊस होत असून जनजीवनविस्कळीत झालं आहे. मुंबई गोवा महामार्गावरची वाहतूक कुडाळ नजीक पावशी इथं महामार्गावर पाणी आल्यामुळे गेले १२ तास ठप्प आहे. दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात पावसाचा जोर कायम आहे. परिणामी पंचगंगा नदीचं पात्र फुगलं आहे. राजाराम बंधारा ३० फुटांवर असून नदीची इशारा पातळी ३९ आहे. जिल्ह्यातील ५० बंधारे पाण्याखाली गेले आहेत.राधानगरी धरण ४३ टक्के भरलं आहे. कोल्हापूर बाजारभोगाव राजापूर राज्यमार्ग बंद झाला आहे.

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पावसानं काल अकोला जिल्ह्यात हजेरी लावली. त्यामुळे जिल्ह्यातल्या खोळंबलेल्या पेरण्या मार्गी लागणार असल्यानं शेतकरी आनंदात आहेत. मात्र, चांदूर - खडकी परिसरात काल अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी शेतात पाणी साचून भाजीपाला पाण्याखाली गेला. जिल्ह्यातल्या मोर्णा नदीच्या पाणी पातळीत देखील मोठी वाढ झाली आहे. हवामान खात्यानं मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे.

**<><><><><>**

विधिमंडळ अधिवेशनासाठी मुसळधार पावसामुळे आमदार वेळेत पोहोचू न शकल्याने विधानसभेचं कामकाज आज आधी दुपारी १ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प हा सामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, वंचित, महिला, उपेक्षितांचा अर्थसंकल्प आहे, खोट्या गोष्टी पसरवणाऱ्यांचं तोंड बंद करणारा हा अर्थसंकल्प आहे, असं आमदार प्रवीण दरेकर यांनी आज विधानपरिषदेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान सांगितलं. शेतकरी, महिला, वारकरी, बेरोजगार या समाजघटकांसाठी या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या विविध योजनांचा पुनरुच्चार त्यांनी केला.

विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार निरंजन डावखरे आणि जगन्नाथ अभ्यंकर यांनी आज विधान परिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. नंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झाले.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकसाठी निवड झालेला भारतीय धावपटू अविनाश साबळे यानं काल डायमंड लीग स्पर्धेत पुरुषांच्या ३ हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात स्वतःचा राष्ट्रीय विक्रम मोडला. पॅरिसच्या चार्लेटी मैदानावर झालेल्या स्पर्धेत अविनाशने ८ मिनिटं , ९ सेकंद आणि ९१ मायक्रोसेकंदां मध्ये अंतर पार करत नवा विक्रम प्रस्थापित केला. या विक्रमासह अविनाशला स्टीपलचेस प्रकारात सहावं स्थान मिळवता आलं. जुना राष्ट्रीय विक्रमही अविनाशच्या नावावर नोंदला आहे. दोन वर्षांपूर्वी अविनाशनेच बर्मिंघमच्या राष्ट्रकुल स्पर्धेत स्टीपलचेस प्रकारात ८ मिनिटं आणि ११ सेकंद २० मायक्रोसेकंद असा विक्रम केला होता.

<><><><><>

मुंबई शहरात साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी अतिरिक्त पंप उपलब्ध करून देण्यात आले आहेत, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज विधान परिषदेत दिली. मुंबईतलं जनजीवन पावसामुळे विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर, सध्या परिस्थिती काय आहे आणि ती पूर्ववत

करण्यासाठी काय पावलं सरकार उचलत आहे, याबाबतचं निवेदन सरकारने करावं, असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्यानंतर ते बोलत होते.

पावसामुळे राज्याच्या, विशेषतः मुंबईचं जनजीवन विस्कळीत होण्याला सरकार जबाबदार असल्याची टीका विधानसभेतले विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली .

//<><><><><>//